**पोमसं/ संगणक कक्ष/ सीसीटीएनएस/ सिटीझन पोर्टल/ २५७ / २०२१.**
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय
Maharashtra Rajya Police Mukhyalaya,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई- 400 001.
Shahid Bhagat Singh Marg,Colaba,Mumbai - 400 001.
**दिनांक- ३० /११/२०२१.**

## परिपत्रक

**विषय**- सी.सी.टी.एन.एस. संगणक प्रणालीच्या सिटीझन पोर्टल (Citizen Portal) अंतर्गत भाडेकरु / पेईंगगेस्ट माहिती विनंती तसेच, मुद्रांक व नोंदणी विभाग (IGR) सुविधेचा वापर करणेबाबत..

**संदर्भ**- १. गु.अ.वि.,पुणे यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र.अ.पो.म.सं/ संगणक/१३०/२०२०, दि.१८/०२/२०२०.
२. गु.अ.वि.,पुणे यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र.अ.पो.म.सं/ संगणक/१२३७/२०२०,दि.०९/१२/२०२०.

महाराष्ट्र पोलीस दलाच्या सी.सी.टी.एन.एस. संगणकप्रणाली मध्ये सिटीझन पोर्टल (Citizen Portal) अंतर्गत नागरिकांच्या सोयीसाठी विविध सेवा उपलब्ध आहेत. सदर सुविधांचा भाग म्हणून, सिटीझन पोर्टल (Citizen Portal) अंतर्गत भाडेकरु / पेईंगगेस्ट माहिती विनंती तसेच, मुद्रांक व नोंदणी विभाग (IGR) सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

सिटीझन पोर्टल (Citizen Portal) अंतर्गत "भाडेकरु / पेईंगगेस्ट माहिती विनंती" या सुविधेव्दारे घरमालकांनी भाडेकरुंची माहिती पोलीस ठाण्यास ऑनलाईन कळविणे आवश्यक आहे. सिटीझन पोर्टलवरुन घरमालकांनी भाडेकरुंनी माहिती ऑनलाईन भरल्यानंतर, सदरची माहिती "नागरिकांसाठी सेवा" या मोडयुलमधील "भाडेकरु पडताळणी तपशील पाहा" या शिर्षकाखाली पाहता येते व त्यानुसार, पुढील कार्यवाही करता येईल.

तसेच, सी.सी.टी.एन.एस.मधील "सर्च अॅन्ड क्युरी (Search and Query)" या मोडयुलमध्ये "IGR- भाडेकरु तपशील शोधा आणि पाहा" या शिर्षकाखाली घरमालक व भाडेकरुंची माहिती पोलीस ठाण्यांना पाहता येते. 'पोलीस विभाग' व 'मुद्रांक व नोंदणी विभाग (IGR)' यांचे संयुक्त विदयमानाने, एकीकरणा (Integration) व्दारे IGR (i-SARITA) प्रणालीमध्ये नागरिकांनी ऑनलाईन भरलेली E-Leave & License ची माहिती CCTNS संगणकप्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे, पोलीस ठाण्यांना त्यांचे हद्दीत राहणारे भाडेकरु व घरमालक यांची माहिती, सध्याचा व मुळ पत्ता, फोटो, अंगुलीमुद्रासह करारनाम्याची प्रत यांची लिंक उपलब्ध करुन देण्यात आली असून, नागरिकांना पोलीस ठाण्यामध्ये येवून संबंधीत माहिती देणे बंधनकारक राहिलेले नाही.

त्याअनुषंगाने, सर्व घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्तबाबत त्यांचे अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाणे/ कार्यालये यांना अवगत करुन, सदर माहितीचा उपयोग गुन्हयातील पाहीजे / फरारी आरोपी शोधणेकामी, नावावरुन गुन्हा किंवा अटकेची माहिती पाहणेकामी पोलीस ठाण्यांच्या दैनंदिन कामकाजात करणेबाबत सुचित करावे.

**( डॉ. सुहास वारके )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

**प्रति,**

सर्व पोलीस आयुक्त (मुंबई लोहमार्ग सह), महाराष्ट्र राज्य.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग पुणे नागपूर, औरंगाबाद सह), महाराष्ट्र राज्य.

**प्रत,**

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीस विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उप महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य.

क्र. पोमसं/२०/१९९९/भाडेकरू (टेनट)/सर्व घटक/६८/२०१३
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, पोलीस मुख्यालय,
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ०१
दिनांक :- ०१/१२/२०२१

प्रति,
श्री.मगरध्वज हनुमंत काशीद,
वकील शिवरकर असोसिएट,
के १०८, मेगा सेंटर, हडपसर,
पुणे - ४११०१३

संदर्भ:- आपले दिनांक १४/०८/२०२१ चे ई-मेल संदेश.

विषय :- घरमालकांनी भाडेकरूची (टेनट) माहिती पोलीस ठाण्यास कळविणे रद्द करण्याबाबत सुधारित परिपत्रक काढावे व संपूर्ण राज्याकरिता सीसीटीएनएस अंतर्गत एकच प्रणाली विकसित करण्याचे आदेश देणेबाबत.

*****

महोदय,

आपण दिनांक १४/०८/२०२१ रोजी या कार्यालयास केलेल्या ई-मेल संदेशास अनुसरून या कार्यालयाने निर्गमित केलेले **दिनांक ३०.११.२०२१** रोजीचे परिपत्रक. [illegible] ची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

(**श्री.चं.इमडे**)
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (वि.शा)
पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई